# तपास (प्रात्यक्षिक)

## प्रकरण – १२

# विविध गुन्ह्यांच्या चेकलिस्ट

# विविध गुन्ह्यांच्या चेकलिस्ट

## अ) खून

१) खुनाच्या घटनेची फिर्याद सविस्तर व मुद्देसूद घेतली आहे काय?

२) आरोपी निष्पन्न असल्यास त्यास अटक करण्यात आली आहे का? अटकेच्या वेळी सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांचा अवलंब केलेला आहे काय?

३) इक्वेस्ट फॉर्ममधील परिपूर्ण व प्रत्येक कॉलमप्रमाणे भरला आहे काय?

४) शवविच्छेदन फॉर्ममधील परिपूर्ण व प्रत्येक कॉलमप्रमाणे भरला आहे काय?

५) शवविच्छेदन झाल्यानंतर ॲडव्हॉन्स सर्टिफिकेट प्राप्त करून घेतले आहे काय?

६) गुन्ह्यानंतर तत्काळ आरोपीची घरझडती घेण्यात आली आहे काय?

७) घटनास्थळाचा पंचनामा सविस्तर व बारकाईने केला आहे काय? घटनास्थळी पडलेले रक्त, रक्तमिश्रित माती, साधी माती व इतर भौतिक पुरावाजन्य वस्तू जप्त केलेल्या आहेत काय?

८) घटनास्थळाचे फोटो/ व्हिडिओ रेकॉर्डिंग केले आहे काय?

९) जप्तमालाची मुद्देमाल पावती फाडून तपासाच्या कागदपत्रांमध्ये समाविष्ट आहे काय?

१०) घटना पाहणारे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असल्यास त्यांच्याकडे प्राधान्याने तपास करून टिपणे नोंदविण्यात आली आहेत काय?

११) महत्त्वाच्या प्रकरणात निष्पन्न असलेले साक्षीदार भविष्यात फुटण्याची शक्यता दिसून येत असल्यास त्यांचे सी.आर.पी.सी. कलम १६४ प्रमाणे जबाब नोंदविण्याची कार्यवाही केली आहे काय?

१२) मयताचे/ आरोपीचे रक्त व कपडे, जप्त हत्यार व इतर जप्त मुद्देमाल योग्य प्रश्नावली विचारून तपासणीकरिता संबंधित तज्ज्ञांकडे तात्काळ पाठविले आहे काय?

१३) व्हिसेरा राखून ठेवलेला असल्यास सी.ए. तपासणीसाठी पाठविला आहे काय?

१४) गुन्ह्याच्या हेतुविषयी आणि गुन्ह्याची तयारी, प्रयत्न व कृती याबाबत ठोस पुरावा गोळा केला आहे काय?

१५) कटाच्या गुन्ह्यांमध्ये कट कोठे, केव्हा, कोणी, कसा केला याबाबत साक्षीदारांकडे तपास करण्यात आला आहे काय?

१६) मयत व आरोपी यांच्यामध्ये पूर्वी झालेल्या तक्रारीच्या संबंधाने पुरावा घेतला आहे काय?

१७). घटनास्थळाचा नकाशा तहसीलदार यांच्याकडून काढून घेतला आहे काय?

१८) भारताच्या हत्यार कायद्याखाली येणाऱ्या हत्याराने खून करण्यात आला असल्यास दोषारोपपत्र पाठविण्यापूर्वी त्याबाबत जिल्हादंडाधिकारी यांची परवानगी घेतली आहे काय?

१९) मृत व्यक्तीस झालेल्या जखमा गुन्ह्याच्या तपासात जप्त केलेल्या हत्यारानेच झालेल्या आहेत काय? याबाबत वैद्यकीय अधिकारी यांना हत्यार दाखवून त्यांचे अभिप्राय घेतलेले आहेत काय?

२०) आरोपी अटकेत असल्यास ९० दिवसांच्या आत दोषारोपपत्र पाठविण्याची व्यवस्था केली आहे काय?

**खून (अनोळखी प्रेत असल्यास) –**

१) मयताचे अंगावरील कपडे, त्यावरील टेलर मार्क, अंगावरील दागिने, व्यंग, गोंदण, तीळ, जुन्या जखमा इतर वैशिष्ट्ये पंचनाम्यात नमूद आहे काय? त्याबाबत तपास केला आहे काय?

२) मयताच्या वारसांचा शोध घेण्यासाठी सविस्तर तपास याद्या तसेच वर्तमानपत्रे, पत्रके वाटून, सार्वजनिक ठिकाणी चिकटवून प्रसिद्धी केली आहे काय? तसेच मयताचे बोटांचे ठसे, फोटो घेतले आहेत का?

३) मिसिंग व्यक्ती ब्युरोकडे तपास केला आहे काय?

४) आजूबाजूच्या जिल्ह्यातील मिसिंगच्या वर्णनाशी मयताचे वर्णन जुळते अगर कसे? याबाबत तपास केला आहे काय?

५) पोलीस पाटलाच्या मदतीने आजूबाजूच्या गावात नमूद प्रेत मिळालेबाबत दवंडी पिटविण्यात आली आहे काय?

६) मयताचा नुसता सांगाडा मिळाला असल्यास त्याबाबत संबंधित तज्ज्ञांकडे तपासणीसाठी पाठविण्यात आला आहे काय? तसेच सदर सांगाड्यातील कवटी संभाव्य व्यक्तीची असावी असे वाटत असल्यास त्याचा फोटो मिळवून सुपर इंपोजिशनसाठी प्रयत्न केले आहेत काय?

७) मयतास शेवटी पाहणाऱ्या साक्षीदारांना निष्पन्न करून तपास करण्यात आला आहे काय?

८) मयताचे जवळ मिळून आलेल्या विशिष्ट वस्तू, कागदपत्रांच्या अनुषंगाने तपास करण्यात आला आहे का?

९) अनोळखी प्रेताचा तपास लागण्यासाठी शवविच्छेदनावेळी योग्य मुद्यावर प्रश्नावली विचारून वैद्यकीय अधिकाऱ्यांचे मत घेण्यात आलेले आहे का? (उदा. स्त्री असेल तर बलात्कार झाला आहे का?, गर्भवती आहे का?, मयत किती वेळापूर्वी जेवलेला आहे वगैरे.)

■■■■

## ब) बलात्कार

१) पीडित महिलेची फिर्याद नातलग/महिला कर्मचारी हजर असताना घेतली आहे काय?

२) गुन्ह्यास योग्य कलमे लावली आहेत काय?

३) महिला डॉक्टर यांच्याकडून वैद्यकीय तपासणी करून घेतली आहे काय? तसेच महिला डॉक्टरांनी योग्य नमुन्यात तसेच वयाबाबत सर्टिफिकेट दिले आहे काय?

४) बलात्कारित मुलगी अल्पवयीन असल्यास त्याबाबत पुरावा घेतला आहे काय?

५) आरोपीची वैद्यकीय तपासणी केली आहे काय?

६) बलात्कारित महिलेचे/ आरोपीचे कपडे तात्काळ जप्त करून त्या कपड्यांवर रक्त, वीर्य किंवा इतर पुरावा मिळाल्याबाबत पंचनाम्यात उल्लेख आहे काय?

७) रासायनिक विश्लेषण तज्ज्ञांकडे अभिप्राय मिळविणेकरिता मुद्देमाल पाठविताना विचारलेली प्रश्नावली योग्य आहे काय?

८) बलात्कारित महिला गर्भवती होऊन मूल जन्मलेले असल्यास आवश्यकतेनुसार डी.एन.ए. चाचणी केली आहे काय?

९) आरोपी व्यक्ती बलात्कार करण्यास सक्षम असल्याबाबत वैद्यकीय अधिकारी यांचा अभिप्राय घेतला आहे काय?

१०) आरोपीस अटक केली असेल तर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही झाली काय?

११) आरोपीने गुन्ह्यानंतर त्रयस्थ इसमास विश्वासाने कबुली दिली असल्यास अशा साक्षीदाराचा जबाब नोंदविला आहे काय? जबाबात आरोपीचे व त्या साक्षीदाराचे जवळचे विश्वासाचे संबंध कशामुळे आहेत याबाबतची कारणे नमूद केली आहेत काय?

१२) आरोपी अनोळखी असेल तर ओळख परेड घेतली आहे काय?

१३) फिर्यादीने सांगितल्याप्रमाणे साक्षीदार तपासले आहेत काय? उदा. घटनास्थळाच्या आजूबाजूचे, लॉजवर गुन्हा घडला असल्यास तेथील संबंधित साक्षीदार आणि बलात्कारानंतर ज्या व्यक्तीस प्रथम माहिती दिली ती व्यक्ती.

१४) बलात्कारित महिलेची आरोपीने चित्रफीत, छायाचित्रे घेतल्याचे तपासात निष्पन्न होत असल्यास

त्याबाबतची साधने, निगेटिव्हज पुराव्यात जप्त केलेली आहेत काय?

१५) घटनास्थळी जप्त केलेल्या वस्तूंच्या अनुषंगाने तुलनात्मक तपास केला आहे काय?

१६) घटनास्थळाचा नकाशा काढणेसाठी तहसीलदार/ तालुका भूमीअभिलेख यांच्याकडे अहवाल दिलेला आहे काय?

१७) आरोपी फरारी असल्यास आरोपी पकडण्यासाठी काय प्रयत्न केलेले आहेत?

१८) आरोपी अटकेत असेल तर मुदतीत दोषारोप पत्र पाठविणेकामी काय प्रयत्न केले आहेत?

१९) पीडित महिला निराधार अगर वेडी असल्यास तिला स्त्री सुधारगृहात पाठविण्याची कार्यवाही करण्यात आली आहे काय?

२०) पीडित महिला अनुसूचित जाती-जमातीवर्गातील असल्यास त्याबाबत जिल्हा दंडाधिकारी, जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांना माहिती देण्यात आली आहे काय?

२१) पोलीस कोठडीत अथवा सामाजिक संस्थांचे ठिकाणी बलात्कार झाला असल्यास त्याबाबत राज्य मानवी हक्क आयोगास व कार्यक्षेत्राधीन न्यायदंडाधिकारी यांना माहिती देण्यात आली आहे काय?

■■■■

## क) गर्दी–मारामारी

१) सविस्तर फिर्याद घेतली आहे काय? फिर्याद उशिरा दाखल केली असल्यास कारण नमूद केले आहे काय?

२) जखमींना तात्काळ औषधोपचारासाठी पाठविलेले आहे काय?

३) जखमेच्या स्वरूपानुसार योग्य कलमे लावलेली आहेत काय?

४) गुन्ह्याच्या फिर्यादीनुसार घटनास्थळी निर्माण झालेल्या परिस्थिती अनुरूप पंचनाम्याच्या वेळी वस्तू जप्त करण्यात आल्या आहेत काय?

५) आरोपीने समान हेतूने व उद्देशाने गुन्हा केल्याबाबत पुरावा मिळविला आहे काय?

६) फिर्यादीने सांगितलेले सर्व साक्षीदार यांच्याकडे तपास केला आहे काय?

७) घटनेमध्ये सार्वजनिक मालमत्तेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असेल तर फोटो व व्हिडिओ रेकॉर्डिंग केली आहे काय? तसेच फोटोग्राफर व व्हिडिओ रेकॉर्डिंग करणाऱ्यांकडे तपास केला आहे काय?

८) गुन्हा घडला त्यावेळी त्या क्षेत्रांत जिल्हादंडाधिकारी यांनी जमावबंदीचे आदेश लागू केले असल्यास त्या आदेशाची मूळ प्रत किंवा त्यांच्याकडूनच साक्षांकित केलेली प्रत समाविष्ट केली आहे काय?

९) घटनेमध्ये साक्षीदार जखमी असतील तर त्यांना झालेल्या जखमा जप्त हत्यारानेच झालेल्या आहेत याबाबत वैद्यकीय अधिकाऱ्यांचे मत घेतले आहे काय?

१०) प्रत्यक्ष पाहणारे जास्तीत जास्त साक्षीदार मिळविण्याचा प्रयत्न केला आहे काय?

११) कोणत्या आरोपीने काय केले (उदा. कोणी काठी मारली, कोणी तलवार मारली, कोणी हाताने मारले) याचा उल्लेख साक्षीदाराच्या जबाबात आहे अगर कसे? त्याप्रमाणे प्रत्येक आरोपीकडे तपास करण्यात आला आहे काय? त्याच आरोपीकडून तेच हत्यार जप्त केले आहे काय?

१२) आरोपी फरारी असतील तर त्यांना अटक करणेकामी काय प्रयत्न केले आहेत?

१३) मुद्देमाल पावती तात्काळ फाडली आहे काय?

१४) आरोपीस अटक केली असेल तर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही झाली आहे काय?

१५) मुद्देमाल तपासणीसाठी पाठविला आहे काय? त्याची स्थळप्रत कागदपत्रात सामील आहे काय?

१६) रासायनिक विश्लेषण तज्ज्ञांकडे मत मिळविणेकरिता विचारलेली प्रश्नावली योग्य आहे काय?

१७) आरोपी जामिनावर सुटल्यास तात्काळ प्रतिबंधक कारवाई केली आहे काय?

■■■■

## ड) मालमत्तेचे गुन्हे

१) खबरी जबाब सविस्तर घेतलेला आहे काय? त्यामध्ये गेलेल्या मालाचे वर्णन सविस्तर घेतले आहे काय? खबरी जबाबाची नक्कल फिर्यादीस मिळाल्याबाबत सही आहे काय?

२) सविस्तर पंचनामा केला अगर कसे; पंचनाम्यामध्ये पंचाच्या सह्या, वेळ नमूद आहे का?

३) घटनास्थळावर काही संशयास्पद वस्तू मिळाल्या आहेत काय? त्या संबंधाने तपास केला आहे काय?

४) गेलेल्या मालाबाबत सर्व पोलीस ठाण्यांना बिनतारी संदेश दिला आहे काय?

५) गुन्हा उघडकीस आला नसल्यास 'ई' फॉर्म पाठविला आहे काय?

६) गुन्हे शाखेकडून किती आरोपीचे सजेशन आले आहे? त्यापैकी किती आरोपींना चेक केले? घरझडत्या घेतल्या?

७) अशा प्रकारचे गुन्हे करणारे रेकॉर्डवरील माहीतगार गुन्हेगार किती चेक केले?

८) गुन्हा उघडकीस येईल असे सकारात्मक माहिती सांगणारे साक्षीदार तपासले काय? तसेच फिर्यादी अगर जवळच्या साक्षीदारांकडे नजीकच्या काळात रंगकाम, फर्निचर, प्लंबिंग वगैरे कामासाठी व वॉचमन/ सुरक्षा कर्मचारी यांच्याकडे चौकशी केली आहे काय?

९) मुंबई पोलीस कायदा कलम १२६ प्रमाणे कितीजणांना नोटिसा दिल्या?

१०) तपास याद्या सविस्तर बनविलेल्या आहेत काय? त्यामध्ये मालाचे अचूक आणि सविस्तर वर्णन केले आहे काय?

११) आरोपीच्या पद्धतीवरून इतर पोलीस ठाण्यांकडून आरोपी वर्ग करून तपास केला आहे काय?

१२) श्वानपथक व अंगुली मुद्रातज्ज्ञ यांना पाचारण करण्यात आले होते अगर कसे?

१३) फिर्यादी/ साक्षीदाराने आरोपीस पाहिले असल्यास त्यांना अभिलेखावरील सराईत गुन्हेगारांचे फोटो दाखविण्यात आले आहेत काय? तसेच त्यांच्या सांगण्याप्रमाणे संगणकावर रेखाचित्र तयार करण्यात आले आहे काय?

१४) गुन्हा वरिष्ठ भेटीचा असल्यास उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी भेट दिली आहे काय? त्यांनी भेटीच्या वेळी काय सूचना दिलेल्या आहेत व त्याप्रमाणे तपास झाला आहे काय?

■■■■

# गुन्हा उघडकीस आला असल्यास

१) आरोपीकडून गेलेल्या मालापैकी किती माल हस्तगत करण्यात आला आहे?

२) गुन्ह्यातील चोरीस गेलेली मालमत्ता पूर्णपणे जप्त का होऊ शकली नाही त्यासंबंधाने योग्य तपास केला गेला आहे काय?

३) आरोपीस अटक केली असेल तर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही झाली आहे काय?

४) माल हस्तगत केला असेल तर कोणाकडून हस्तगत केला त्याचा सविस्तर मेमोरँडम (निवेदन) पंचनामा तसेच संबंधित पंचनामे बरोबर आहेत काय? निवेदनावर आरोपीची सही व पंचनाम्याची प्रत मिळाल्याबाबत सही घेण्यात आली आहे काय?

५) जप्त मुद्देमालाची पावती फाडून रजिस्टरी नोंद घेऊन मुद्देमाल कारकून यांचे ताब्यात तात्काळ दिला आहे काय?

६) हस्तगत केलेला माल फिर्यादी/ साक्षीदार यांना दाखवून ओळख पटवून घेतली आहे काय?

७) जप्त केलेला मुद्देमाल आणि फिर्यादीत वर्णन केलेला माल एकच असल्याची खात्री झाली आहे काय?

८) पोलीस अभिरक्षेत असताना प्रत्यक्षात लॉकअप रजिस्टरप्रमाणे तपासासाठी आरोपीस ज्यावेळी बाहेर काढले आहे. त्याची तपासातील वेळेशी सुसंगती दिसून येत आहे काय?

९) फिर्यादी/ साक्षीदाराने आरोपी पाहिला असल्यास ओळख परेड झाली आहे काय?

१०) मालमत्तेच्या गुन्ह्यांत फिर्यादी/ साक्षीदार/ आरोपी जखमी असल्यास वैद्यकीय प्रमाणपत्र घेतली आहेत काय?

११) फिर्यादीमध्ये नमूद असलेल्या प्रकारचेच हत्यार जप्त आहे काय?

१२) जप्त केलेल्या हत्याराने जखम झालेली आहे याबाबत वैद्यकीय अधिकारी यांचा अभिप्राय घेतला आहे काय?

१३) जप्त मुद्देमालाबद्दल तज्ज्ञांचा अभिप्राय आवश्यक असेल तर संबंधित मुद्देमाल तज्ज्ञांकडे तात्काळ पाठविण्यात आला आहे काय?

१४) जप्त हत्यारे आरोपीने कोठून मिळविलेली आहेत याबद्दल तपास केला आहे काय?

■■■■

## इ) अपघाताचे गुन्हे

१) मोटार अपघाताची परिपूर्ण खबर घेतली आहे काय?

२) अपघातावरून तत्काळ गुन्हा दाखल केला आहे काय? तसेच गुन्ह्यास योग्य कलमे लावली आहेत काय?

३) अपघातामध्ये ज्याची चुकी आहे त्याच्यावरच गुन्हा दाखल केला आहे काय?

४) अपघातामध्ये कोणत्या वाहन चालकाची चूक आहे. त्यासंबंधाने तपासी अंमलदार यांनी काय पुरावा गोळा केलेला आहे?

५) परिस्थितीनुरूप अपघातातील वाहनचालकाची मद्यपान सेवन केलेबाबत वैद्यकीय तपासणी करून घेतली आहे काय?

६) घटनास्थळाचा पंचनामा, नकाशा काढला आहे काय? तसेच वाहनांचा नुकसानीचा पंचनामा केला आहे काय?

७) पंचनाम्याच्या वेळी अपघातग्रस्त वाहनामध्ये किंमती माल असल्यास पंचांसमक्ष ताब्यात घेतला आहे काय?

८) अपघातात जखमी झालेल्या व्यक्तींना वैद्यकीय मदत मिळण्यासाठी काय उपाययोजना केली आहे? तसेच त्यांच्या नातेवाईकांना माहिती दिलेली आहे काय?

९) अपघातग्रस्त वाहने सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आलेली आहेत काय?

१०) अपघात प्रत्यक्ष पाहणारे तिऱ्हाईत साक्षीदार यांच्याकडे तपास केला आहे काय?

११) वाहनांतील प्रवास करणारे साक्षीदार, वाहनांचे ड्रायव्हर/ क्लीनर यांचे जबाब घेतले काय?

१२) अपघात गंभीर असेल तर आरटीओ यांचेकडून वाहन तपासणी जर किरकोळ अपघात असेल तर स्थानिक गॅरेजवाले यांच्याकडून वाहनाची तपासणी केली आहे काय?

१३) वाहनांच्या सर्व कागदपत्रांच्या प्रती हस्तगत केलेल्या आहेत काय?

१४) वाहनांचा परवाना, टॅक्स, इन्शुरन्स अद्यावत आहे काय?

१५) दोन्ही वाहनचालकांच्या लायसन्सच्या प्रती ताब्यात घेतलेल्या आहेत काय?

१६) अपघातात जखमी असतील तर त्याचे दुखापतीचे सर्टि. कागदपत्रात सामील आहे काय?

१७) अपघातात कोणी मयत असेल तर ॲडव्हान्स सर्टि. अगर शवविच्छेदन अहवाल कागदपत्रात सामील आहे काय?

१८) अपघातास वरिष्ठ अधिकारी यांनी भेट दिली असल्यास त्यांनी सूचना दिल्याप्रमाणे तपास झाला आहे काय?

१९) अपघात करुन वाहन निघून गेले असल्यास ते मिळविण्यासाठी काय काय प्रयत्न केले आहेत?

२०) अपघाताच्या अनुषंगाने कोणाची काही तक्रार आहे काय?

२१) मोटार अपघातातील ड्रायव्हर यांना मोटार वाहन नियम २०९ प्रमाणे नोटीस देण्यात आलेली आहे काय?

२२) सर्व कागदपत्रांची कायदेशीर पूर्तता झाल्यानंतर लागलीच वाहने ताब्यात दिलेली आहेत काय?

२३) दाखल असलेल्या मोटार अपघाताचे संबंधाने विहित नमुन्यात माहिती भरून मोटार अपघात न्यायधिकरण यांच्याकडे पाठविण्यात आले आहेत काय?

२४) अपघातातील चूक असणाऱ्या वाहन चालकाचा वाहन चालविण्याचा परवाना रद्द करण्याविषयी आर.टी.ओ. यांच्याकडे रिपोर्ट पाठविला आहे काय?

■■■■

## ई) मनुष्य मिसिंग

१) खबरेमध्ये मिसिंग व्यक्तीचे सविस्तर वर्णन रजिस्टरमधील कॉलमप्रमाणे घेतले आहे काय?

२) मिसिंग व्यक्तीस शेवटच्या क्षणी कोणी पाहिले? याबाबतचे साक्षीदार मिळवून त्यांच्याकडे तपास करण्यात आलेला आहे काय?

३) मिसिंग व्यक्तीच्या नातेवाईकांकडे तपास करण्यात आलेला आहे काय?

४) मिसिंग व्यक्तीचे कोणाबरोबर वैमनस्य, प्रेमसंबंध, आर्थिक व्यवहार होते अगर कसे? याबाबत तपास करण्यात आलेला आहे काय?

५) मिसिंग व्यक्तीचा शोध होणेबाबत त्याचे वर्णनावरून जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे यांना तत्काळ बिनतारी संदेश दिलेला आहे काय?

६) मिसिंग व्यक्तीच्या तपासाकामी त्याचे नजीकच्या काळातील फोटो व वर्णनासह तपासयाद्या पाठविण्यात आलेल्या आहेत काय?

७) मिसिंग व्यक्तीचा शोध लागण्याकरिता वृत्तपत्रे, दूरदर्शन तसेच मिसिंग व्यक्तीच्या गावी महत्त्वाच्या सार्वजनिक ठिकाणी प्रसिद्धी करण्यात आलेली आहे काय?

८) मिसिंग पर्सन ब्युरो यांचेकडे मिसिंग व्यक्तीबाबत माहिती कळविलेली आहे काय?

९) मिसिंग व्यक्ती बाहेर जाताना काही सांगून गेली असेल तर त्याबाबत तपासात शहानिशा केलेली आहे काय?

१०) मिसिंग व्यक्तीच्या संबंधाने स्थानिक व लगतच्या रुग्णालयात तपास करण्यात आला आहे काय?

११) मिसिंग व्यक्तीच्या मिसिंग होण्याच्या कालावधीत जिल्ह्यामध्ये दाखल झालेल्या बेवारस मयतांची पडताळणी केलेली आहे काय?

१२) मिसिंग व्यक्ती राहात असलेल्या गावातील, शाळा/ कॉलेजातील, ऑफिस वगैरे मधील अन्य समवयस्क व्यक्ती मिसिंग आहे काय? असल्यास त्याचा या मिसिंग व्यक्तीशी काही संबंध दिसून येत आहे का याबाबत तपास केला आहे काय?

१३) मिसिंग व्यक्तीजवळ एखादी महत्त्वाची वस्तू असेल उदा. मोबाईल फोन त्या अनुषंगाने सदर व्यक्ती मिसिंग होण्यापूर्वी कोणाशी संपर्क झालेला आहे. याबाबतची माहिती मिळवून तपास झालेला आहे काय?

■■■■

## फ) महिला अत्याचारासंदर्भात दाखल गुन्हे

१) भादंविसंक.४९८ (अ), ४९८ (अ), ३०६ किंवा ४९८(अ), ३०४ (ब) या प्रकारच्या गुन्ह्यांची खबर ही सविस्तरपणे व काळजीपूर्वक घ्यावी. त्यामध्ये नातेसंबंध, लग्न केंव्हा झाले, कोणी त्रास दिला, किती पैशांची मागणी केली, कोणत्या प्रकारे त्रास दिला, पीडित व्यक्तीने याबाबत आपले माहेरी कळविले होते काय? याचा सविस्तर उल्लेख आहे काय? व गुन्ह्यास योग्य कलमे लावलेली आहेत काय?

२) पोलीसांना माहिती मिळाल्यानंतर घटनास्थळी तात्काळ भेट देऊन पंचनामा करण्यात आला आहे काय?

३) सदर गुन्ह्यामध्ये यातील पीडित महिलेचीच अगर तिच्या रक्ताच्या नात्यातील (आई, वडील, भाऊ, बहीण, चुलता, चुलती, मामा-मामी, मावशी, आत्या) या नातलगांचीच फिर्याद घेतली आहे काय?

४) गुन्ह्याचे तपासाचे कागदपत्रामध्ये लग्नपत्रिका सामील केली आहे काय?

५) प्रेतावरील इन्क्वेस्ट पंचनामा सविस्तर परिस्थितीप्रमाणे काळजीपूर्वक केला आहे काय?

६) गुन्ह्याच्या फिर्यादीमध्ये पीडित महिलेच्या लग्न ठरतेवेळी कोणत्याही स्वरूपात हुंडा देण्या-घेण्याची काहीही बोलणी झालेली नव्हती हे नमूद केले आहे काय?

७) पीडित व्यक्तीने तिला होणाऱ्या त्रासासंबंधी यापूर्वी पोलीस ठाण्यात तक्रार केली होती काय? याबाबत साक्षीदार तपासून त्यासंबंधीचा पुरावा समाविष्ट केला आहे काय?

८) गुन्ह्याचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांकडे प्रत्यक्षात कशा पद्धतीने शारीरिक, मानसिक जाच-हाट छळ केला जात होता, याबाबत तपास केला आहे काय?

९) पीडित व्यक्तीने तिच्या त्रासाच्या निवारणासाठी सामाजिक महिला संघटनांचा आधार घेतला होता काय? असल्यास त्यांच्याकडील पुरावा मिळविला आहे काय?

१०) पीडित व्यक्ती त्रासामुळे अशक्त अगर मानसिकदृष्ट्या कमकुवत झाली असल्यास त्याबाबत तिच्यावर नेहमी उपचार करणारे डॉक्टर आणि उपचार केले नसल्यास सरकारी डॉक्टरांकडून तपासणी करून पुरावा गोळा केला आहे काय?

११) पीडित व्यक्तीच्या पतीचे कोणाशी अनैतिक संबंध होते काय?

१२) पीडित व्यक्तीने मरणापूर्वी चिठ्ठी लिहिली असल्यास तसे तिचे नैसर्गिक हस्ताक्षर मिळवून त्याबाबत हस्ताक्षरतज्ज्ञांचा अभिप्राय घेतला आहे काय?

१३) पीडित व्यक्ती जखमी स्थितीत असताना तिचा मृत्यूपूर्व जबाब नोंदविला आहे काय?

१४)  शवविच्छेदन अहवाल प्राप्त करून घेतला आहे काय?

१५) पीडित व्यक्तीच्या मित्र/मैत्रिणींकडे तपास केला आहे काय?

१६) पीडित व्यक्तीचा त्रास कमी व्हावा या उद्देशाने माहेरचे नातलग सुरुवातीस मागणी केलेल्या काही वस्तू अगर रोकड आरोपींना देतात. अशा वेळी त्या खरेदी केल्याबाबत अगर रोकड चेकद्वारे दिली असल्यास त्याबाबत पुरावा गोळा केला आहे काय?

१७) लग्नाचा फोटो मिळवून तो कागदपत्रात समाविष्ट केला आहे काय?

१८) वरिष्ठ अधिकारी यांनी भेट दिलेली असल्यास त्यांनी तपासकामी दिलेल्या सूचनांची पूर्तता केली आहे काय?

१९) आरोपीस अटक केली असेल तर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही झाली आहे काय?

## भा.दं.वि.सं.क. ३५४ व ५०९ प्रमाणे दाखल गुन्ह्यांबाबत

१) अशा प्रकारच्या गुन्ह्यांची प्रथम खबर शक्यतो पोलीस ठाण्याकडील महिला अधिकारी/कर्मचारी व दक्षता समितीच्या स्त्री सदस्य यांच्या उपस्थितीत घेतली आहे काय?

२) पीडित महिलेशी झटापट झाली असल्यास वैद्यकीय तपासणी केली आहे काय?

३) गुन्हा करतेवेळी आरोपी काय बोलला, आणि काय कृती केली? याबाबत फिर्यादीमध्ये आवश्यक तो मजकूर नमूद केला आहे काय?

४) भा.द.वि.सं.क. ५०९ या गुन्ह्यामध्ये आरोपीने काय खुणा, हावभाव केले? काय अश्लील वर्तन केले? काय शब्द वापरले? याबाबत फिर्यादीमध्ये खुलासा झाला आहे काय?

५) गुन्ह्यातील आरोपीने अश्लील वर्तन करीत असताना फोटो, व्हिडिओ शुटींग केली असल्यास फोटोच्या निगेटिव्ह व फोटो, व्हिडिओ सीडीज व कॅसेट जप्त करण्यात आल्या आहेत काय?

६) आरोपीने गुन्हा करताना काही लिखित स्वरूपात अश्लील मजकूर लिहून गुन्हा केला असल्यास अगर संगणक किंवा मोबाईल फोनच्या साधनाने गुन्हा केला असल्यास त्यासंबंधीचे कागदपत्र व साधने जप्त केली आहेत काय?

७) गुन्ह्यामधील महत्त्वाच्या साक्षीदारांकडे तपास करून टिपणे नोंदविली आहेत काय?

■■■■

## प) अकस्मात मृत्यू

१) अकस्मात मृत्यूची खबर सविस्तर घेतलेली आहे काय?

२) अकस्मात मृत्यू दाखल करताना मयताचे वय, जात, धर्म, शिक्षण, व्यवसाय, मरणाचे कारण नमूद केले आहे काय?

३) इन्क्वेस्ट पंचनामा सविस्तर केला आहे काय? त्यामध्ये मयताचे अंगावर जखमांबाबत तसेच व्यंग, गोंदण, तीळ, जुन्या जखमांचे व्रण याबाबत काळजीपूर्वक नोंदी घेतल्या आहेत काय?

४) मयत व्यक्ती स्त्री असल्यास त्यामध्ये स्त्री पंचास घेण्यात आले आहे काय?

५) वैद्यकीय अधिकाऱ्यांना पत्र पाठवून ॲडव्हान्स प्रमाणपत्र घेतले आहे काय?

६) शवविच्छेदन फॉर्म व्यवस्थित भरलेला आहे काय?

७) प्रेत वारसाचे ताब्यात दिल्याची वारस पावती कागदपत्रात सामील केली आहे काय?

८) प्रेत वाहून नेण्यासाठी दिलेल्या दाखल्याची स्थळप्रत कागदपत्रात सामील केली आहे काय?

९) मयत व्यक्तीचे फोटो कागदपत्रात समाविष्ट केले आहेत काय?

१०) वरिष्ठ अधिकारी यांनी दिलेल्या सूचनांची पूर्तता केली आहे काय?

११) मयताचे रक्ताचे नातेवाईक/मित्र/मैत्रिणी शेजारी यांच्याकडे तपास केला आहे काय?

१२) पोलीस नियमावली भाग तीन नियम २१२ चा खंड २ (ब) अन्वये साक्षीदारांच्या तपास टिपणावर सह्या घेऊ नयेत असे नमूद केले आहे. त्यानुसार टिपणे दिसून येत आहेत का?

१३) नातेवाईकांनी केलेल्या तक्रारीच्या मुद्याप्रमाणे तपास केला आहे काय?

१४) साक्षीदार व्हेरिफाय केले आहेत काय? तसेच साक्षीदारांची काही तक्रार आहे काय?

१५) शवविच्छेदन अहवाल प्राप्त केला आहे काय?

१६) जप्त मुद्देमाल आवश्यकतेनुसार केमिकल ॲनलायझर्सकडे पाठवून तसा त्यांचा अभिप्राय प्राप्त केलेला आहे काय?

### ब. अनोळखी अकस्मात मृत्यू असल्यास

वरील सूचनांव्यतिरिक्त,

१) अनोळखी अ.मृ.चा तपास कमीतकमी पो.स.ई. दर्जाच्या अधिकारी यांनी केला आहे काय?

२) मयताचे रक्त काढून घेऊन त्याच्या ब्लडग्रुप बाबतचा अहवाल संबंधित वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेतला आहे काय?

३) मयताच्या बोटांचे ठसे (अंगुली मुद्रा) घेऊन तपासणीकरिता पाठविले आहेत काय?

४) मयताच्या फोटो व वर्णनाबाबतची माहिती वर्तमानपत्र/दूरदर्शन व स्थानिक केबलद्वारे प्रसिद्ध केलेली आहे काय?

५) मयताची ओळख पटविण्यासाठी मयताच्या फोटोसह त्याच्याजवळ मिळालेल्या वस्तू त्याच्या वर्णनासह तपास याद्या पाठविल्या आहेत काय?

६) मयताच्या अंगावरील कपडे त्याच्याजवळ मिळून आलेल्या वस्तू जप्त केल्या आहेत काय?

७) जप्त मुद्देमालाबाबत त्वरित पावती फाडून मुद्देमाल जमा केला आहे काय?

८) जप्त केलेल्या वस्तूंचा पंचनामा सविस्तर केला आहे काय? उदा. टेलरमार्क, जवळ मिळालेली कागदपत्रे.

९) जिल्ह्यांतील व लगतच्या जिल्ह्यांतील तत्सम मुदतीत मिसिंग व्यक्तीबाबत सविस्तर तपास केलेला आहे काय?

१०) पोलीसपाटील यांच्या मिटींगमध्ये मयताची ओळख पटविण्यासाठी फोटो व वर्णन सांगून चर्चा केली आहे काय?

११) प्रेताचा अंत्यविधी केल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवून तपासाच्या कागदपत्रामध्ये समाविष्ट केले आहे काय?

१२) मिसिंग पर्सन ब्युरो यांचेकडे तपास केलेला आहे काय?

१३) मयताच्या अंगावरील कपड्याचा टेलरमार्क व इतर खाणाखुणा तसेच दागिने मिळून आल्यास त्याबाबत तपास केलेला आहे काय?

१४) मयताची ओळख पटविण्याकामी आजूबाजूच्या गावांमध्ये दवंडी देण्यात आली आहे काय?

१५) अनोळखी मयताची ओळख पटविण्याच्या दृष्टीने बसस्टॅण्ड, रिक्षाचालक, फेरीवाले यांच्याकडे चौकशी व सार्वजनिक ठिकाणी तपास यादी लावण्यात आलेली आहे काय?

१६) बेवारस मयताबाबतची छायाचित्रे, बोटाचे ठसे व चेहरेपट्टीसह माहिती पोलीस राजपत्रात प्रसिद्धी करण्याकरिता मा. अपर पोलीस महासंचालक (गु.अ.वि.पुणे) यांच्याकडे पाठविली आहे काय?

१७) मयताचे मरणाबाबत, जखमांबाबत किंवा इतर बाबत वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे जी प्रश्नावली विचारलेली आहे, ती योग्य आहे काय?

१८) सी.ए. कडील अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदरचा अहवाल वैद्यकीय अधिकारी यांना दाखवून मृत्यूच्या कारणाबाबत अंतिम अहवाल घेण्यात आला आहे काय?

■■■■

## ख) दुखापत

१) गुन्ह्यांची सविस्तर खबर त्यामध्ये हत्यार कोणते होते? तसेच जखमेचे स्वरूप नमूद केले आहे काय?

२) प्रत्येक आरोपीच्या हातामध्ये कोणते हत्यार होते आणि त्याने शरीराच्या कोणत्या भागावर दुखापती केल्या आहेत. याबाबत फिर्यादीमध्ये उल्लेख आहे काय? तसेच मेमोरँडम पंचनाम्यामध्ये फिर्यादीमध्ये उल्लेख केल्याप्रमाणेच संबंधित आरोपीकडून संबंधित हत्यार जप्त केले आहे काय?

३) गुन्ह्यास योग्य कलमे लावली आहेत अगर कसे?

४) दुखापत झालेल्या इसमास तत्काळ यादी देऊन औषधोपचाराकरिता पाठविले अगर कसे?

५) घटनास्थळाचा पंचनामा त्यामध्ये हत्यार जागेवर मिळून आल्यास ते जप्त करून त्याचा उल्लेख पंचनाम्यात केलेला आहे काय?

६) जप्त केलेले हत्यार फिर्यादीत वर्णन केल्याप्रमाणे तसेच जखमेशी मिळते जुळते आहे काय?

७) साक्षीदार/ फिर्यादी यांना झालेली जखम जप्त हत्याराने झालेली आहे काय याबाबत वैद्यकीय अधिकारी यांचा अभिप्राय घेतला आहे काय?

८) दुखापतीचे सर्टिफिकेट तात्काळ हस्तगत केले आहे काय?

९) प्रत्यक्ष घटना पाहणारे साक्षीदारांकडे तपास केला आहे काय?

१०) पूर्वी काही तक्रारी दाखल असल्यास त्याचे उतारे कागदपत्रात सामील केले आहेत काय?

११) घटनास्थळाचा नकाशा काढला आहे काय?

१२) आरोपीस अटक केली असेल तर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही झाली आहे काय?

१३) आरोपीची वैद्यकीय तपासणी करून त्याबाबतचे प्रमाणपत्र हस्तगत केले आहे काय?

१४) आरोपी जामिनावर सुटल्यास त्याचेवर तात्काळ प्रमाणपत्र हस्तगत केले आहे काय?

१५) आरोपी अनोळखी असल्यास ओळख परेडची कार्यवाही केली आहे काय?

१६) फिर्यादी जर शासकीय नोकर असेल व संबंधित कलमे लावली असतील तर फिर्यादी सरकारी काम करीत होता याबाबत पुरावा गोळा केला आहे काय?

१७) जप्त केलेल्या हत्याराची मुद्देमाल पावती फाडली आहे काय?

१८) जप्त मुद्देमाल आवश्यकतेनुसार केमिकल ॲनलायझर्सकडे पाठवून तत्संबंधी त्यांचे प्रमाणपत्र समाविष्ट केले आहे काय?

■■■■